**L. A. BILL No. XLI OF 2021.**

A BILL

*TO PROVIDE FOR THE RESERVATION OF POSTS IN APPOINTMENTS BY DIRECT RECRUITMENT OF PERSONS BELONGING TO THE SCHEDULED CASTES, SCHEDULED TRIBES, DE-NOTIFIED TRIBES (VIMUKTA JATIS), NOMADIC TRIBES, SPECIAL BACKWARD CATEGORY, OTHER BACKWARD CLASSES AND ECONOMICALLY WEAKER SECTIONS TO TEACHERS' CADRE IN CERTAIN EDUCATIONAL INSTITUTIONS ESTABLISHED, MAINTAINED OR AIDED BY THE STATE GOVERNMENT AND FOR THE MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.*

## सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१.

**राज्य शासनाने, स्थापन केलेल्या, चालवलेल्या किंवा अनुदान दिलेल्या विवक्षित शैक्षणिक संस्थांमधील अध्यापक संवर्गासाठी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांतील व्यक्तींची सरळसेवा भरतीद्वारे नियुक्ती करताना, पदे आरक्षित ठेवण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** राज्य शासनाने, स्थापन केलेल्या, चालवलेल्या किंवा अनुदान दिलेल्या विवक्षित शैक्षणिक संस्थांमधील अध्यापक संवर्गासाठी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांतील व्यक्तींची सरळसेवा भरतीद्वारे नियुक्ती करताना, पदे आरक्षित ठेवण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकापासून अंमलात येईल.

व्याख्या. **२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(क) "अभ्यास शाखा" याचा अर्थ, पदविका, स्नातक (पदवीपूर्व), स्नातकोत्तर (पदव्युत्तर), आणि विद्यावाचस्पती (पी.एचडी.) स्तरांवरील अर्हतांच्या चार प्रमुख स्तरांवरील अर्हता देणारी अभ्यास शाखा, असा आहे ;

(ख) "निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती)" याचा अर्थ, शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या जमाती, असा आहे ;

(ग) "सरळसेवा भरती" याचा अर्थ, शैक्षणिक संस्थेत अध्यापन करण्यासाठी पात्र असलेल्या व्यक्तींकडून, सार्वत्रिक जाहिरातीद्वारे अर्ज मागवून, अध्यापक म्हणून नियुक्ती करण्याची प्रक्रिया, असा आहे ;

(घ) "आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक" याचा अर्थ, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १५ च्या खंड (६) च्या स्पष्टीकरणात निर्दिष्ट केलेले दुर्बल घटक, असा आहे ;

(ङ) "शैक्षणिक संस्था" याचा अर्थ,—

(एक) राज्य अधिनियमाद्वारे किंवा त्यान्वये स्थापन केलेले किंवा विधिसंस्थापित केलेले आणि राज्य शासनाकडून अनुदान मिळत असणारे, विद्यापीठ ;

(दोन) विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ याच्या कलम ३ अन्वये अभिमत विद्यापीठ म्हणून घोषित केलेली, आणि राज्य शासनाकडून चालविलेली किंवा अनुदान मिळणारी संस्था ; १९५६ चा ३.

(तीन) राज्य शासनाकडून चालवलेली किंवा अनुदान मिळत असणारी आणि उप-खंड (एक) मध्ये निर्दिष्ट केलेल्या संस्थेशी संलग्न असलेली, संस्था किंवा महाविद्यालय अथवा संस्थांचा किंवा महाविद्यालयांचा गट ; अथवा उप-खंड (एक) किंवा उप-खंड (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या संस्थेचे घटक युनिट ; किंवा

(चार) एखाद्या सोसायटीने किंवा विश्वस्त संस्थेने किंवा खाजगी व्यवस्थापन संस्थेने चालवलेली आणि राज्य शासनाकडून अनुदान मिळत असणारी,– मग ते प्रत्यक्षपणे असो किंवा अप्रत्यक्षपणे असो,– आणि उप-खंड (एक) मध्ये निर्दिष्ट केलेल्या संस्थेशी संलग्न असलेली संस्था किंवा महाविद्यालय किंवा संस्थांचा किंवा महाविद्यालयांचा गट ; किंवा

(पाच) सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये राज्य शासनाने, स्थापन केलेली शैक्षणिक संस्था, असा आहे ; १८६० चा २१.

(च) "विद्याशाखा" याचा अर्थ, शैक्षणिक संस्थेची विद्याशाखा, असा आहे ;

(छ) "शासन" किंवा "राज्य शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ज) "अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था" याचा अर्थ, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३० च्या खंड (१) अन्वये तसे करण्याचा हक्क असणाऱ्या अल्पसंख्याक समाजाने स्थापन केलेली व त्याच्याकडून प्रशासन केलेली शासन मान्यताप्राप्त संस्था, असा आहे ;

(झ) "भटक्या जमाती" याचा अर्थ, शासनाने वेळोवेळी घोषित केल्याप्रमाणे, त्यांच्या उपजीविकेच्या शोधासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी भटकंती करणाऱ्या जमाती, असा आहे ;

(ञ) "इतर मागास वर्ग" याचा अर्थ, शासनाने घोषित केल्याप्रमाणे, नागरिकांचे कोणतेही सामाजिकदृष्ट्या व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग, असा आहे आणि त्यामध्ये, महाराष्ट्र राज्याच्या संबंधात भारत सरकारने घोषित केलेल्या इतर मागास वर्गांचा समावेश होतो ;

(ट) "मंजूर संख्या" याचा अर्थ, राज्य शासनाने मान्यता दिलेली, अध्यापक संवर्गातील पदसंख्या, असा आहे ;

(ठ) "अनुसूचित जाती" याचा अर्थ, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४१ अन्वये अधिसूचित केलेल्या अनुसूचित जाती, असा आहे ;

(ड) "अनुसूचित जमाती" याचा अर्थ, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४२ अन्वये अधिसूचित केलेल्या अनुसूचित जमाती, असा आहे ;

(ढ) "विशेष मागास प्रवर्ग" याचा अर्थ, शासनाने, विशेष मागास प्रवर्ग म्हणून घोषित केलेले, नागरिकांचे सामाजिकदृष्ट्या व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग, असा आहे ;

(ण) "अध्यापक संवर्ग" याचा अर्थ, अभ्यास शाखा किंवा विद्याशाखा यांचा विचार न करता, ज्यांना कोणताही भत्ता किंवा बोनस वगळून, समान वेतन श्रेणीतील पारिश्रमिक दिले जाते अशा, एखाद्या शैक्षणिक संस्थेच्या सर्व अध्यापकांचा वर्ग, असा आहे.

शैक्षणिक संस्थांच्या भरतीमध्ये पदांचे आरक्षण.

**३.** (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे राज्य शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मर्यादेत व रीतीने, एखाद्या शैक्षणिक संस्थेमधील अध्यापक संवर्गातील मंजूर पद संख्येपैकी सरळसेवा भरतीमध्ये पदांचे आरक्षण असेल.

(२) पदांच्या आरक्षणाच्या प्रयोजनार्थ, शैक्षणिक संस्था ही, एक युनिट असल्याचे समजण्यात येईल.

विवक्षित प्रकरणी अधिनियम लागू नसणे.

**४.** कलम ३ च्या तरतुदी,—

(क) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था ;

(ख) **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे राज्य शासनाकडून घोषित करण्यात येतील अशा सर्वोत्कृष्ट संस्था किंवा संशोधन संस्था,

यांना लागू असणार नाहीत.

अधिसूचना मांडणे.

**५.** या अधिनियमान्वये, राज्य शासनाने काढलेली प्रत्येक अधिसूचना, ती काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे, ते एका सत्राने मिळून बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रांनी मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना, ठेवण्यात येईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या लागोपाठचे सत्र संपण्यापूर्वी, जर त्या अधिसूचनेत कोणतेही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले, किंवा ती अधिसूचना काढण्यात येऊ नये, याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर ती अधिसूचना केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा, यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही, तथापि, अशा फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या अधिसूचनेअन्वये यापूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**६.** (१) जर या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप अडचण उद्भवेल त्याप्रमाणे, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१.]**

**[राज्य शासनाने, स्थापन केलेल्या, चालवलेल्या किंवा अनुदान दिलेल्या विवक्षित शैक्षणिक संस्थांमधील अध्यापक संवर्गासाठी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांतील व्यक्तींची सरळसेवा भरतीद्वारे नियुक्ती करताना, पदे आरक्षित ठेवण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे,**
मुख्यमंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

राज्य शासनाने, स्थापन केलेल्या, चालवलेल्या किंवा अनुदान दिलेल्या विवक्षित शैक्षणिक संस्थांमधील अध्यापक संवर्गासाठी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांतील व्यक्तींची सरळसेवा भरतीद्वारे नियुक्ती करताना, पदे आरक्षित ठेवण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम .

राज्य शासनाने, स्थापन केलेल्या, चालवलेल्या किंवा अनुदान दिलेल्या विवक्षित शैक्षणिक संस्थांमधील अध्यापक संवर्गासाठी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांतील व्यक्तींची सरळसेवा भरतीद्वारे नियुक्ती करताना, पदे आरक्षित ठेवण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम .

राज्य शासनाने, स्थापन केलेल्या, चालवलेल्या किंवा अनुदान दिलेल्या विवक्षित शैक्षणिक संस्थांमधील अध्यापक संवर्गासाठी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांतील व्यक्तींची सरळसेवा भरतीद्वारे नियुक्ती करताना, पदे आरक्षित ठेवण्यासाठी
+ ÉÉhÉ iÉiºÉÆ¤ÉÆÊvÉiÉ ÊEÆöÉÉ iÉnùxÉÖ¹ÉÆÊMÉEò ¤ÉÉ¤ÉÓºÉÉ`öÒ iÉ®úiÉÚnù Eò®úhªÉÉEò®úÊiÉÉ +ÊvÉÊxɪÉ¨É .